| MHAU060007932026 | दिवाणी किरकोळ अर्ज/१६०/२०२६<br>मुक्ताबाई रामराव काळे वि.. निरंक |
|---|---|

**निशाणी १ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी 'वारसा दाखला' मिळणेकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ कलम २ अन्वये दाखल केला आहे. अर्जदार व त्यांचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

**अर्जदार यांच्या अर्जाचा सारांश पुढीलप्रमाणे**

२. कै.रुंजाबा सखाराम काळे हे दिनांक ०९/०९/१९७५ रोजी ताडपिंपळगाव, ता.कन्नड जि. छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. मयत व्यक्तीचे अर्जदार क्र.१ ही सून आणि अर्जदार क्र.२ ते ४ हे नातलग या नात्याने वारस आहेत.

३. कै.रुंजाबा सखाराम काळे यांना खालीलप्रमाणे कायदेशीर वारस आहेत.

| अ.क्र. | वारसांची नावे | वय | राहणेचे ठिकाण | मयताशी असलेले नाते |
|---|---|---|---|---|
| १. | मुक्ताबाई रामराव काळे | ८५ | ताडपिंपळगाव, ता.कन्नड | सून |
| २. | शिवनाथ रामराव काळे | ६५ | -//- | नातू |
| ३. | मच्छिंद्र रामराव काळे | ६२ | -//- | नातू |
| ४. | ज्ञानेश्वर रामराव काळे | ६० | -//- | नातू |

४. कै.रुंजाबा सखाराम काळे यांना वरील वारसांशिवाय अन्य कोणीही वारस

नाहीत असे त्यांनी कथन केले आहे. कै.रुंजाबा सखाराम काळे यांचा मुलगा रामराव रुंजाबा काळे यांचा मृत्यू दिनांक २५/०३/२०२१ रोजी ताडपिंपळगाव, ता.कन्नड येथे झालेला आहे. कै.रुंजाबा सखाराम काळे यांची पत्नी नामे मकूबाई रुंजाबा काळे ही दिनांक २२/१०/२००७ रोजी ताडपिंपळगाव, ता.कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयात वारसाची नोंद करण्यासाठी, तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, तसेच महसूल दप्तरी वारसाचे मिळकतीत नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे, सदर वारस प्रमाणपत्राची नोंद होणे गरजेचे आहे.

५. सदर अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायालयाने स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला. सदरच्या आदेशान्वये स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला.

६. अर्जदारांच्या कथनांवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांनी मागणी केल्याप्रमाणे दाद मागण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी... |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर... |

७. अभिलेखावरील कागदपत्रांची पडताळणी केली असता असे दिसून येते की, अर्जदार यांनी अर्जाच्या पुष्ट्यर्थ पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर पुराव्याला विहीत मुदतीत कोणीही हरकत/आक्षेप नोंदवलेला नाही. याशिवाय अर्जदार यांनी कै.रुंजाबा सखाराम काळे यांच्या मृत्यूचा दाखला दाखल केला आहे, तसेच

'सोलापूर तरुण भारत' या वर्तमान पत्रामधील जाहीर नोटिस दाखल केली आहे.

८. अभिलेखावरील कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कै.रुंजाबा सखाराम काळे यांचा मृत्यू दिनांक ०९/०९/१९७५ रोजी झाला होता. दिनांक २४/०४/२०२६ रोजी 'सोलापूर तरुण भारत' या वर्तमानपत्रातून प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस तसेच अर्जाच्या पुष्ट्यर्थ पुराव्याचे शपथपत्र दाखल आहे. अर्जदार यांनी दिलेल्या पुराव्याचे शपथपत्र तसेच जाहीर नोटीशीस कोणत्याही व्यक्तीने विहीत मुदतीत आक्षेप वा हरकत घेतलेली नाही. त्यामुळे, अर्जदार व जाबदार हेच कै.रुंजाबा सखाराम काळे यांचे वारस आहेत. वरील सर्व पुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, अर्जदार यांनी दाखल केलेला कागदोपत्री पुरावा हा निर्विवाद आहे. वारसा प्रमाणपत्राने कोणत्याही व्यक्तीचा हक्क निर्माण होत नाही किंवा नाश होत नाही. वारसा प्रमाणपत्राने औपचारिकरित्या मयत व्यक्तीस कोण वारस आहेत हे जाहीर केले जाते. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देवून मुद्दा क्र.२ बाबत मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. कै.रुंजाबा सखाराम काळे यांचे अर्जदार क्र.१ मुक्ताबाई रामराव काळे, अर्जदार क्र.२ शिवनाथ रामराव काळे, अर्जदार क्र.३ मच्छिंद्र रामराव काळे आणि अर्जदार क्र.४ ज्ञानेश्वर रामराव काळे हे सून आणि नातलग या नात्याने वारस आहेत.

३. अर्जदारांना बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट, १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र अदा करण्यात यावे.

(खुल्या न्यायालयात जाहीर)

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.08.10 13:49:57 +0530

कन्नड (वि. द. पाटील)

दिनांक : १०/०८/२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

कन्नड

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Vishnu D. Khambat, (Grade-III) |
| Court | V. D. Patil, Civil Judge Jr. Dn., &<br>J.M.F.C., Court No.1, Kannad |
| Date | 10/08/2026 |
| Order signed by the Presiding Officer | 10/08/2026 |
| Order uploaded on | 10/08/2026 |